ePaper
# महाराष्ट्रातच राहणार, लोकसभा लढवणार नाही: फडणवीस



| वर्ष - 7 । अंक - 189 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । शुक्रवार, दिनांक 17 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- गंभीरकडून विराट कोहलीचे कौतुक!
- अंकिता देणार गोड बातमी?
- सुनावल्यानंतर राज्यपाल नरमले!
- ७० वर्षे मराठ्यांचा घात झाला!


# ठाकरे-शिंदे गटांत राडा!

## » शिवतीर्थावर शिवसेनेचे दोन्ही गट भिडले, बाळासाहेबांच्या स्मारकाचं नुकसान

### »मुख्यमंत्र्यांची औरंगजेबाशी तुलना ; संजय राऊत कडाडले

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आज १७ नोव्हेंबर रोजी ११ वा स्मृतीदिन आहे. बाळासाहेबांच्या स्मृतीदिनानिमित्त देशभरातील त्यांचे चाहते आणि शिवसैनिक त्यांना अभिवादन करण्यासाठी, त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शिवतीर्थावर (छत्रपती शिवाजी महाराज पार्क, दादर) येत असतात. आदल्या दिवसापासूनच शिवतीर्थावर गर्दी जमू लागते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनीदेखील शिवतीर्थावर जाऊन दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केलं. तसेच तिथला बंदोबस्त आणि सुविधांची पाहणी केली. एकनाथ शिंदे यांच्यापाठोपाठ शिवतीर्थावर शिवसैनिकांची गर्दी जमली. शिवसेनेच्या दोन्ही गटांचे कार्यकर्ते शिवतीर्थावर जमल्यामुळे बराच वेळ तिथे तणाव निर्माण झाला होता.**



शिवतीर्थावर दाखल झालेल्या शिवसेनेच्या दोन्ही गटांनी एकमेकांकडे पाहून घोषणाबाजी केली. या घोषणाबाजीचं मोठ्या राड्यात रुपांतर झालं. शिवतीर्थावर शिवसैनिकांनी एकमेकांना धक्काबुक्कीदेखील केली. तसेच या राड्यामुळे बाळासाहेबांच्या स्मारकाचं नुकसान झाल्याचं सांगितलं जात आहे. दोन्ही गटांमध्ये मोठा राडा झाल्याने शिवाजी पार्क परिसरात तणाव वाढला आहे. परिणामी मुंबई पोलिसांचं एक पथक शिवतीर्थावर दाखल झालं. त्यानंतर पोलिसांनी दोन्ही गटातील कार्यकर्त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. पाठोपाठ शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई आणि अनिल परबदेखील शिवतीर्थावर दाखल झाले. ठाकरे गटाच्या दोन्ही नेत्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना शांत राहण्याचं आवाहन केल्यानंतर परिस्थिती पोलिसांच्या नियंत्रणात आली. पाठोपाठ शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्केदेखील शिवतीर्थावर पोहोचले. या सगळ्या प्रकारावर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. खासदार राऊत यांनी ट्विटर या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर घटनेचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. यासह संजय राऊत यांनी म्हटलं आहे की, शिवतीर्थावरील आदरणीय शिवसेना प्रमुखांचे स्मृतीस्थळ पवित्र आहे. त्याचे पावित्र्य राखायला हवे. छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीस्थळावर औरंग्याची पिलावळ जाणे मान्य नाही. त्याप्रमाणे शिवतीर्थावर अफझलखानाच्या अनौरस पिलावळीने जाणे बरे नाही. अन्यथा पावित्र्य भंग होईल. त्यामुळे शिवसैनिक एका निष्ठेने भिडणाराच! जय महाराष्ट्र!

### आम्हाला श्रद्धांजली वाहायची आहे

» दरम्यान, घटनास्थळी दाखल झालेले शिवसेना नेते अनिल देसाई यांनीदेखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली. देसाई म्हणाले, "आमच्यासाठी उद्याचा दिवस खूप खास आहे. आम्ही शांततेनं इथे जमलो होतो. आम्हाला श्रद्धांजली वाहायची आहे. काही लोक इथे तमाशा करण्यासाठी येत आहेत. परंतु, कोणीही विघ्न आणण्याचा प्रयत्न केला, अनर्थ घडवण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही तसं होऊ देणार नाही. आम्ही खंबीरपणे इथे उभे आहोत." दरम्यान, देसाई यांना स्मृतीस्थळाच्या नुकसानाबाबत विचारले असता अनिल देसाई म्हणाले, काहींनी हा प्रकार केला. बाकीच्या गोष्टी नंतर बघू. आत्ता त्या लोकांना इथून निघू द्या. सध्या आपण संयमाने राहू. मी आमच्या कार्यकर्त्यांना शांत राहण्याचं आवाहन केलं आहे.

# भारत आणि ऑस्ट्रेलियामध्ये होणार वर्ल्ड कप २०२३ ची फायनल

## » ऑस्ट्रेलिया आठव्यांदा अंतिम फेरीत; उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेवर 3 विकेट्स राखून विजय

। मुंबई ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आता वर्ल्ड कप २०२३ चा अंतिम सामना होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. बुधवारी भारताने पहिल्या सेमी फायनलमध्ये न्यूझीलंडवर दणक्यात विजय मिळवला होता आणि फायनलमध्ये धडक मारली होती. गुरुवारी झालेल्या दुसऱ्या सेमी फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेला धूळ चारली आणि अंतिम फेरी गाठली आली. त्यामुळे आता भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात या वर्ल्ड कपची फायनल १९ नोव्हेंबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. ऑस्ट्रेलियाने यावेळी सेमी फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेवर तीन विकेट्स राखून विजय साकारला.**



सेमी फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ केला. प्रथम गोलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेची ४ बाद २४ अशी अवस्था केली होती. दक्षिण आफ्रिकेच्या पहिल्या तिन्ही फलंदाजांना यावेळी दोन अंकी धावसंख्याही करता आली नाही. चार विकेट्स लवकर बाद झाल्यावर दक्षिण आफ्रिकेला सावरले ते डेव्हिड मिलरने. यावेळी मिलरने आठ चौकार आणि पाच षटकारांच्या जोरावर १०१ धावांची खेळी साकारली. मिलरला यावेळी हेन्रिच क्लासिनने ४७ धावांची खेळी साकारली आणि मिलरला चांगली साथ दिली. या दोघांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेला २१२ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून यावेळी मिचेल स्टार्क आणि कर्णधार पॅट कमिन्स यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर जोश हेझलवूड आणि ट्रेव्हिस हेड यांनी प्रत्येकी दोन बळी मिळवले. दक्षिण आफ्रिकेचे २१३ धावांचे आव्हान ऑस्ट्रेलियासाठी माफक वाटत होते. कारण ग्लेन मॅक्सवेलनेच एका सामन्यात नाबाद २०० धावा केल्या होत्या. पण सेमी फायनलचे दडपण हे किती जास्त असते, याचा प्रत्यय यावेळी आला. ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली. त्यांना ६० धावांची सलामी मिळाली. ट्रेव्हिस हेडने यावेळी ९ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ६२ धावांची खेळी साकारली. पण या सामन्यात डेव्हिड वॉर्नर, ग्लेन मॅक्सवेल आणि स्टीव्हन स्मिथसारखे मातब्बर फलंदाज मोठी धावसंख्या उभारू शकले नाहीत.

### फायनलचा महामुकाबला पाहण्यासाठी पंतप्रधान मोदी स्वत: उपस्थित राहणार

»आयसीसी वनडे वर्ल्डकप सेमीफायनलमध्ये भारताने न्यूझीलंडचा ७० धावांनी पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ आतापर्यंत अपराजीत राहिला आहे. आता भारताची लढत १९ नोव्हेंबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध होईल. दरम्यान, १९ नोव्हेंबर रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणाऱ्या फायनलचा महामुकाबला पाहण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: उपस्थित राहणार आहेत.

# पवना, इंद्रायणी नदी प्रदूषित करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा!

## पर्यावरण प्रेमींचे थेट पंतप्रधानांना पत्र

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातून वाहणा-या पवना आणि इंद्रायणी नदीत मैलामिश्रित, रसायनयुक्त पाणी थेटपणे सोडले जाते. त्यामुळे दोन्ही नद्यांची दुरवस्था झाली असून पाण्यावर तवंग येत आहेत. याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत नदी प्रदूषणाला जबाबदार असणा-यांविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर, इंद्रायणी नदीची एकूण लांबी २०.८५ किलोमीटर आहे. तर मुळा नदी शहराच्या सीमेवरून दहा किलोमीटर अंतर वाहते. तळवडेपासून च-होलीपर्यंत इंद्रायणी नदीचे प्रदूषण वाढले आहे. तर, किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे. नदीलगतच्या भागात किवळे, पुनावळे, रावेत, ताथवडे, वाल्हेकरवाडी, थेरगाव, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरी, दापोडी, पिंपळेगुरव, सांगवी, कासारवाडी व दापोडीपर्यंत पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे दिसून येते.

मागील पावसाळ्यात पवना नदीतील पाण्यावर पाचवेळा तवंग आले. थेरगावातील केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग येत आहेत. जलचर प्राणी मृत पडत आहेत. पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी हे इंद्रायणी नदीला प्रदूषित करत आहे. मागील आठवड्यात इंद्रायणी नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग आले होते. एखाद्या अती थंड प्रदेशात ज्याप्रमाणे नदीवर बर्फाची चादर असते तशीच अवस्था इंद्रायणी नदीची झाली होती. नदी प्रदूषणाला महापालिकेचे अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप करत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी थेट पंतप्रधान मोदी यांच्याकडे केली आहे.पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर, इंद्रायणी नदीची एकूण लांबी २०.८५ किलोमीटर आहे. तर मुळा नदी शहराच्या सीमेवरून दहा किलोमीटर अंतर वाहते. तळवडेपासून च-होलीपर्यंत इंद्रायणी नदीचे प्रदूषण वाढले आहे. तर, किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे. नदीलगतच्या भागात किवळे, पुनावळे, रावेत, ताथवडे, वाल्हेकरवाडी, थेरगाव, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरी, दापोडी, पिंपळेगुरव, सांगवी, कासारवाडी व दापोडीपर्यंत पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे दिसून येते. मागील पावसाळ्यात पवना नदीतील पाण्यावर पाचवेळा तवंग आले.

> पवना, इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाबाबत सातत्याने आवाज उठवत आहोत. परंतु, महापालिका प्रशासन नदीच्या प्रदूषणाकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे नदी प्रदूषणाला जबाबदार असणा-यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी पंतप्रधानांकडे पत्राद्वारे केली आहे.
>
> **-प्रशांत राऊळ,** पर्यावरणप्रेमी

# पुणे विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिवपदी डॉ. विजय खरे

## कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांचा पाच वर्षांचा कार्यकाल संपुष्टात

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांचा पाच वर्षांचा कार्यकाल संपुष्टात आला आहे. त्यामुळे संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे यांची प्रभारी कुलसचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**

पूर्णवेळ कुलसचिव निवडीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आणि पुढील आदेशापर्यंत डॉ. खरे यांच्याकडे प्रभारी कुलसचिव पदाची जबाबदारी राहणार आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी आपला पाच वर्षांचा कार्यकाळ १२ नोव्हेंबर रोजी पूर्ण केला. त्यामुळे त्यांना या पदावरून मुक्त करण्यात आले आहे.

त्यामुळे आता डॉ. पवार पुन्हा विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत होणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या कुलसचिव पदाची जबाबदारी डॉ. विजय खरे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. कुलसचिव पदाच्या भरतीसाठीचा प्रस्ताव विद्यापीठ




प्रशासनाने शासनाला सादर केला आहे. त्यामुळे विद्यापीठातर्फे जाहिरात प्रसिद्ध करून पूर्णवेळ कुलसचिवांची निवड, नियुक्ती होईपर्यंत डॉ. खरे यांना कुलसचिव पदाची जबाबदारी पेलावी लागणार आहे.गेल्या काही दिवसांपासून विद्यापीठात विद्यार्थी संघटना, राजकीय वाद झाले होते. त्यामुळे विद्यापीठात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या तणावातूनच विद्यापीठ परिसरात जमावबंदी लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील शैक्षणिक, प्रशासकीय कामकाज सुरळीत राहण्याचे आव्हान डॉ. खरे यांच्यासमोर आहे.

### विद्यापीठात तणावाचे वातावरण

आता डॉ. पवार पुन्हा विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत होणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या कुलसचिव पदाची जबाबदारी डॉ. विजय खरे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. कुलसचिव पदाच्या भरतीसाठीचा प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनाने शासनाला सादर केला आहे. त्यामुळे विद्यापीठातर्फे जाहिरात प्रसिद्ध करून पूर्णवेळ कुलसचिवांची निवड, नियुक्ती होईपर्यंत डॉ. खरे यांना कुलसचिव पदाची जबाबदारी पेलावी लागणार आहे. गेल्या काही दिवसांपासून विद्यापीठात विद्यार्थी संघटना, राजकीय वाद झाले होते. त्यामुळे विद्यापीठात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मोशीमध्ये दुसरे इंद्रायणी साहित्य संमेलन!

## उद्घाटन प्रसंगी साहित्यिक डॉ. सागर देशपांडे, आमदार महेश लांडगे उपस्थित राहणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंद्रायणी साहित्य परिषदेच्यावतीने दि. शनिवार (दि. 18) आणि रविवार (दि. 19) रोजी मोशी येथे दुसरे इंद्रायणी साहित्य संमेलन होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजा दीक्षित हे या साहित्य संमेलनाचे उद्घाटक आहेत. साहित्य संमेलनात ग्रंथदिंडी, मुलाखत, पुरस्कार वितरण, पुस्तक प्रकाशन, कवी संमेलन, व्याख्यान, परिसंवाद अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन प्रसंगी साहित्यिक डॉ. सागर देशपांडे, आमदार महेश लांडगे उपस्थित राहणार आहेत. शनिवारी सायंकाळी चार वाजता श्री नागेश्वर मंदिर ते पद्मश्री ना. धों. महानोर साहित्यनगरी (जय गणेश बँक्वेट हॉल) या दरम्यान ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. ग्रंथदिंडीचे पूजन जेजुरीच्या मार्तंड देवस्थानचे विश्वस्त पांडुरंग थोरवे, पालिकेचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते होणार आहे.**

सायंकाळी साडेपाच वाजता ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक दादाभाऊ गावडे यांना प्रज्ञावंत पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तर अ‍ॅड. पांडुरंग थोरवे यांना विशेष पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी संमेलनाध्यक्ष सोपान खुडे आणि स्वागताध्यक्ष गणेश सस्ते आदी उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील वृत्तपत्रीय लेख, अग्रलेखांचे प्रदर्शनाचे उदघाटन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते होणार आहे.

तसेच इतिहास संशोधक संदीप तापकीर लिखित रांगड्या दुर्गवैभवाचा खजिना : कोल्हापूर जिल्ह्यातील किल्ले या पुस्तकाचे प्रकाशन साहित्यिक डॉ. सागर देशपांडे यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी साडे सात वाजता 'दास्तानगोई' हा कलात्मक कार्यक्रम अक्षय शिंपी व नेहा कुलकर्णी सादर करणार आहेत. रात्री साडे आठ ते दहा या दरम्यान कवी राज अहेरराव यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन होणार आहे. रविवारी सकाळी साडे नऊ ते अकरा या वेळेत युवा प्रबोधनकार व विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक ह.भ.प. डॉ. पंकज महाराज गावडे यांचे 'संतत्व आणि साहित्य' या विषयावर व्याख्यान होणार आहे. ज्ञानेश्वरीचे अभ्यासक रामदास जैद हे अध्यक्षस्थान भूषविणार आहे. सकाळी अकरा ते एक या वेळेत 'स्त्रियांचे साहित्यातील योगदान' या विषयावरील परिसंवादात ज्येष्ठ साहित्यिका डॉ. संगीता बर्वे, इंदुमती जोंधळे, डॉ. अपर्णा महाजन, डॉ. लता पाडेकर सहभागी होणार आहे. डॉ. सीमा काळभोर समन्वय करणार आहेत.

दुपारी दोन ते तीन या वेळेत संमेलनाध्यक्ष सोपान खुडे यांची मुलाखत संदीप तापकीर हे घेणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता संदीप तापकीर यांनी लिहिलेल्या 'मालवणी मुलखातील इतिहासाचे पहारेकरी : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किल्ले' या पुस्तकाचे प्रकाशन श्रीमंत रघुजीराजे आंग्रे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विश्वकर्मा पब्लिकेशन्सचे विशाल सोनी उपस्थित राहणार आहेत. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकास 350 वर्षे पूर्ण होत आहेत.

त्याचे औचित्य साधून दुपारी सव्वा तीन वाजता 'शिवराज्याभिषेकाचे ऐतिहासिक महत्त्व' या विषयावरील चर्चासत्रात श्रीमंत रघुजीराजे आंग्रे (इतिहास अभ्यासक व सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचे वंशज), इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे दिग्विजय जेधे (इतिहास अभ्यासक व कान्होजीराजे जेधे यांचे वंशज) हे सहभागी होणार आहेत.




### संमेलनाच्या माध्यमातून संत चोखोबांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचतील– माणिकबुवा मोरे

» संत चोखामेळा साहित्य संमेलनानिमित्त (PUNE) संत चोखामेळा महाराज उत्सव मूर्तीचे माणिकबुवा मोरे यांच्या शुभहस्ते लोकार्पण तर कुचिक दाम्पत्यांच्या हस्ते विधिवत पुजन करण्यात आले. भगवंताने संतांना आपलेसे केले पण समाजाने संतांना आजही आपलेसे केले नाही याची खंत वाटते. संत चोखामेळा यांचे साहित्य, चरित्र, भक्ती जनसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आळंदी येथे आयोजित केलेले साहित्य संमेलन उपयुक्त ठरेल, असा विश्वास जगतगुरू तुकोबाराय यांचे वंशज ह. भ. प. माणिकबुवा मोरे महाराज देहूकर यांनी व्यक्त केला.




### 10 व्यक्तींना दिला जाणार भूमिपुत्र पुरस्कार

» रविवारी सायंकाळी पाच वाजता विविध क्षेत्रातील कर्तबगार दहा व्यक्तींना राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याहस्ते 'भूमिपुत्र पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहेत. माजी आमदार विलास लांडे उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर समारोप सत्रात विचारवंत आणि संपादक संजय आवटे यांचे प्रमुख भाषण होणार आहे. शिवचरित्र अभ्यासक अनिल पवार, राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश रोकडे, माजी सहाय्यक आयुक्त ज्ञानेश्वर मोळक हे उपस्थित राहणार आहेत.

### यांना दिले जाणार विशेष पुरस्कार...

» विकास कंद (सांस्कृतिक देहू), ज्ञानेश्वरी अभ्यासक रामदास जैद (चिंबळी), अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. सुहास कांबळे (मोशी), इतिहासकार जितेंद्र माळी (दिघी), उद्योजक मोहन भोसले (चऱ्होली), स्वकामचे अध्यक्ष सुनील तापकीर (आळंदी), गडकोट अभ्यासक निलेश गावडे (चिंचवड), संस्कृती संशोधक नजिम शेख (आळंदी), ह.भ.प. राजेश बोराटे (मोशी), कराटे प्रशिक्षक गोरखनाथ मोरे (चिखली) यांना भूमिपुत्र पुरस्कार तर अ‍ॅड. पांडुरंग थोरवे (विधी सेवा), सीए संदीप आसवले, सविता खराडे (कष्टकरी महिला संघटन) यांना विशेष पुरस्कार दिला जाणार आहे.

# उपायुक्त, सहाय्यक आयुक्तांच्या कामकाजाचे फेरवाटप!

## दिवाळी सुट्टीनंतरच्या पहिल्याच दिवशी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचा निर्णय

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवाळी सुट्टीनंतरच्या पहिल्याच दिवशी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्तांच्या कामकाजाचे फेरवाटप केले आहे. दोन उपायुक्त आणि एका सहाय्यक आयुक्तांच्या कामकाजात फेरबदल केले आहेत.**






महापालिकेचे उपायुक्त मनोज लोणकर यांच्याकडील भांडार विभागाचे कामकाज काढून अग्निशमन आणि माहिती व जनसंपर्क विभागाचे कामकाज सोपविण्यात आले आहे. तर, जनसंपर्क आणि उद्यान विभागाचे उपायुक्त रविकिरण घोडके यांच्याकडील जनसंपर्क विभागाचा पदभार काढण्यात आला आहे. त्यांच्याकडे आता केवळ उद्यान विभागाची जबाबदारी असणार आहे. शिक्षण आणि अग्निशमन या दोन विभागाची जबाबदारी असलेल्या सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांच्याकडील अग्निशमची जबाबदारी कमी केली आहे. त्यांच्याकडे आता केवळ शिक्षण विभाग ठेवण्यात आला आहे. अहमदनगर येथील जिल्हा नियोजन अधिकारी निलेश भदाने यांची पिंपरी महापालिकेत पदोन्नतीने उपायुक्त म्हणून बदली झाली आहे. भदाने यांच्याकडे मध्यवर्ती भांडार विभागाचे कामकाज आयुक्त सिंह यांनी सोपविले आहे.

### प्रबोधनपर कार्यक्रमासाठी सूचना पाठवा

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने संविधान दिनानिमित्त 26 व 27 नोव्हेंबर रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच, क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त 28 नोव्हेंबर रोजी प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असून यासाठी नागरिक आणि विविध संघटनांनी यासंदर्भातील सूचना लेखी स्वरुपात माहिती व जनसंपर्क विभागात किंवा PRO@PCMCINDIA.GOV.IN या मेल वर 20 नोव्हेंबरपर्यंत पाठविण्यात याव्यात असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे. संविधानाचा विचार आणि संविधानाचे महत्त्व सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी संविधान दिनाचे औचित्य साधून महापालिकेच्या वतीने पिंपरी चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या शेजारील मोकळ्या मैदानात दरवर्षी 26 आणि 27 नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात.




# उसाच्या फडातील गोंधळ

**यंदाचा साखर हंगाम नेहमीपेक्षा उशिरा सुरू झाला. त्यानंतर लगेचच उसाला अधिक दर मिळावेत, या मागणीसाठी कोल्हापुरात आंदोलन सुरू झाले. त्यात जाळपोळ, हाणामारी असे जे प्रकार घडले, ते केवळ राजकीय असूयेपोटी. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सुरू केलेल्या या आंदोलनाला सगळ्याच शेतकऱ्यांचा पाठिंबा नाही. शेतकरी संघटनेसारख्या काही संघटनांनी त्या आंदोलनास विरोधही दर्शवला आहे**



परंतु आपली राजकीय ताकद सिद्ध करण्याच्या प्रयत्नात या आंदोलनाला अनपेक्षित वळण लागले, ते सर्वथा अयोग्य म्हणावे लागेल. या वर्षीचा साखरेचा हंगाम दरवर्षीप्रमाणे अधिक उत्पादनाचा नसेल, हे उसाच्या लागवडीवरून आणि ऐन हंगामात आलेल्या अवकाळी पावसामुळे स्पष्ट दिसत असताना, उशिराने सुरू झालेले कारखाने वेळेवर ऊस मिळवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतील, हे लक्षात घेऊन या आंदोलनाची आखणी करण्यात आली असावी. मुळात कारखान्यांकडे ऊस उत्पादकांना अधिक दर देण्याएवढी क्षमता नसल्याची तक्रार आधीपासूनच सुरू झाली होती. या पार्श्वभूमीवर या वर्षीचा ऊस हंगाम सुरू होत असताना गेल्या हंगामातील उसाला एफआरपी अधिक प्रति टन ४०० रुपये अधिक द्यावेत तसेच चालू हंगामासाठी प्रति टन साडेतीन हजार रुपये एकरकमी उचल मिळावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन सुरू केले आहे. गेल्या हंगामात साखरेचे दर प्रतिक्विंटल ४०० ते ५०० रुपये वाढले होते. साखर कारखान्यांना इथेनॉल विक्रीतून चांगली प्राप्ती झाली आहे. शिवाय सहवीजनिर्मिती आहेच. आसवणी या उपपदार्थातून कारखान्यांनी चांगलीच कमाई केली असल्याने कारखान्यांनी ही रक्कम द्यावी, असे शेट्टी यांचे म्हणणे आहे. याउलट साखर कारखानदारांच्या म्हणण्यानुसार साखरेला मिळालेला जादा दर हा गेल्या तीन-चार महिन्यांतील आहे. तो हंगामात विकलेल्या पूर्ण कालावधीतील साखरेसाठी नाही. खेरीज गेल्या काही हंगामांमध्ये साखरेचे दर स्थिर राहिल्याने कारखान्यांना एफआरपी भागवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज काढावे लागले होते. त्याचे हप्ते अजून भरावे लागत आहेत. त्यामुळे शेतकरी संघटनांनी मागितलेली मागणी ही एकांगी आहे. सर्व साखर कारखान्यांनी त्यांचे हिशोब एफआरपी कायद्यात नमूद असलेल्या रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्मुला (महसुली उत्पन्न वाटप) सूत्रानुसार साखर सहसंचालक कार्यालयाकडे दिले आहेत. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांतील ३७ कारखान्यांनी हिशोब दिले असून कोणताही कारखाना शेतकऱ्यांना एफआरपीशिवाय अधिकची रक्कम देणे लागत नाही, असे कारखानदारांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता अधिक रक्कम देणे शक्य होणार नाही, अशी भूमिका त्यांनी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या दोन्ही वेळच्या बैठकीत स्पष्टपणे सांगितली आहे. थोडक्यात शेतकरी संघटना आणि साखर कारखानदार यांच्यात अर्थकारण जुळत नाही. त्यामुळे त्यांच्यात विसंवाद आहे. अशातच लोकसभा निवडणूक असल्याने राजू शेट्टी यांना यानिमित्ताने आपली आक्रमक ताकद दाखवण्याची आवश्यकता असल्याने, त्यांच्या संघटनेने उसाच्या गाड्या अडवणे, पेटवणे असे प्रकार घडवून आणत कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांतील कारखान्यांचे गाळप ठप्प केले आहे. पलीकडे कर्नाटकात गाळप सुरू झाले आहे. या वर्षी गाळपासाठी २० टक्के ऊस कमी मिळणार आहे. शिवाय ऊस कर्नाटकात जाण्याची भीती साखर कारखानदारांमध्ये आहे. पश्चिम महाराष्ट्रात कारखाने आणि कारखान्यांची घनता जास्त आहे. विशेष करून सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांना उसाचा तुटवडा भासतो. यंदा सोलापूर जिल्ह्यात कारखान्यांकडून उसाची पळवापळवी होण्याची शक्यता आहे. कारखान्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेरून ऊस गाळपासाठी आणण्याच्या स्पर्धा सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक असणार आहे. कर्नाटकातील कारखाने सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतून ऊस नेतात. यंदा राज्य सरकारने परराज्यात ऊस पाठविण्यास बंदी घातली होती. पण, शेतकऱ्यांचा तीव्र विरोध पाहता, तो निर्णय सरकारला मागे घ्यावा लागला होता. यंदाच्या हंगामात उसाचा तुटवडा असल्यामुळे कार्यक्षेत्राच्या बाहेरील उसाचे गाळप करण्यावर कारखान्यांचा भर असणार आहे.

## संपादकीय »

### दुरावलेली दूरदृष्टी..

***गडकरी व फडणवीसांनी केलेल्या घोषणापत्रात याचा उल्लेख अगदी शेवटच्या ओळीत आहे. म्हणजेच जे काम अगदी प्राधान्याने करणे गरजेचे ते सर्वात शेवटी नमूद करण्यात आले.***

उपराजधानी असलेल्या नागपुरात गेल्या सप्टेंबरमध्ये आलेल्या पुराने पुरती नाचक्की झाल्यावर राज्य सरकारने या शहरासाठी अनेक उपाययोजना जाहीर केल्या. त्याचे स्वागत. या योजनांतून करण्यात येणाऱ्या कामांवर सुमारे दोन हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. ही कामे लवकरात लवकर होतील असे गृहीत धरले तरी यामुळे शहराचा धोका टळला का? भविष्यात पूर आलाच तर त्याचे पाणी वाहून जाण्यासाठी ही नवी कामे पुरेशी ठरतील का? यामुळे जीवित व मालमत्तांची हानी टळेल का? याची उत्तरे शोधू पाहाता अनेक नवे प्रश्न उद्भवतात. कोणतीही आपत्ती आली व त्याने सामान्य माणूस हवालदिल झाला की त्यावर उतारा म्हणून हजारो कोटीच्या योजनांची यादी जाहीर करून मोकळे व्हायचे ही सध्याच्या राज्यकर्त्यांची प्रचलित वृत्ती. असे आकडे ऐकले की सामान्यांना दिलासा मिळतो हाच या वृत्तीमागील समज.

**नेमेचि येतो पावसाळा आणि नागपूरला करून जातो खिळखिळा अशी नागपूरची दरवर्षीची अवस्था होऊन बसली आहे. यंदाही त्याचा प्रत्यय आलाच. नागपूरच्या रस्त्यांचा विकास करताना सांडपाणी आणि पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करताना जाणते अजाणतेपणी काहीतरी कुठेतरी गफलत झाली आहे असे दरवर्षी पावसाळ्यात सिद्ध होत आहे.**

# पावसाळ्यातील दुर्दशेवर दोन उपाय



सतत तीन चार दिवस पाऊस आला की (आणि तो येतोच) अंबाझरी जलाशय तुडुंब भरले जाऊन ओव्हरफ्लो होतो. हे पाणी पश्चिम नागपुरमधील अंबाझरीच्या आजूबाजूच्या खोलगट भागात शिरते आणि तिथे पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊन हाहाकार उडतो. हे चित्र दरवर्षीच पाहायला मिळते. इकडे छत्रपती चौकातील रेल्वे पुलाच्या खालीही इतके पाणी साचते की हा मार्गच बंद होऊन जातो आणि मोटरद्वारे पाण्याचा उपसा करावा लागतो. प्रतापनगर चौक ते त्रिमूर्तीनगर चौक दरम्यान रस्त्यावर गुडघाभर पाणी साचते. शंकरनगर चौकाचेही तेच हाल आहेत. आणि सीताबर्डी भागाचे हाल तर काही विचारू नका. संपूर्ण शहरभर कमी अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती होते आणि हे दरवर्षीचेच चित्र आहे. पण अजूनही प्रशासनाला यावर कोणताही कायमस्वरूपी तोडगा काढता आला नाही. पहिला उपाय असा की अंबाझरी तलाव ते नागपूर शहरातील सर्व तलाव हे भूमिगत अथवा बहिर्गत (जे शक्य असेल ते) मोठ्या पाइपलाइनद्वारे कायमचे जोडण्यात यावेत. त्याचा फायदा असा होईल की अंबाझरी तलावातील अतिरिक्त पाणी शहरातील अन्य तलावांत सोडता येईल आणि रस्त्यांवर पूर परिस्थिती निर्माण होणार नाही. शहरात सोनेगाव तलाव, शुक्रवारी तलाव, फुटाळा तलाव, गांधीसागर तलाव असे मोठमोठे तलाव आहेत जे पावसाळ्यात सुद्धा तुडुंब भरत नाहीत. हे सगळे तलाव मोठ्या पाइपलाइनद्वारे एकमेकांशी जोडण्यात आले तर पावसाचे सगळे पाणी रस्त्यांवर वाया न जाता त्याचा भरपूर मोठा साठा शहरात नेहमीसाठी उपलब्ध राहील. त्यामुळे शहरातील अनेक भागांतील पाण्याची टंचाई दूर करता येईल. शिवाय एखादेवेळी दुष्काळ पडला तरी सगळी जलाशये भरलेली राहिल्याने पाण्याची फारशी टंचाई उद्भवणार नाही. दुसरा उपाय असा की रस्त्याच्या दोन्ही बाजूला प्रत्येकी २०-२५ मीटर अंतरावर सुमारे २० ते ३० फूट खोलीच्या चार ते सहा इंच व्यासाच्या कूपनलिका खोदण्यात याव्यात. त्यावर लोखंडी जाळी लावण्यात यावी. पावसाळ्यात या कूपनलिकांद्वारे रस्त्यावर वाहणारे पाणी थेट भूगर्भात जाईल. त्यामुळे रस्त्यावर पाणी तर साचणार नाहीच, पाणी थेट भूगर्भात गेल्यामुळे शहराचा भूजल स्तर वाढण्यास मदत होईल. त्यामुळे शहरातील विहिरींना, बोअरवेल्सना मुबलक पाणी उपलब्ध होऊन पाणी टंचाई दूर होईल. शहराचे प्रचंड प्रमाणात सिमेंटीकरण झाल्यामुळे शहराचे तापमान प्रचंड वाढले आहे. भूगर्भातील जलस्तर वाढल्यामुळे तापमान कमी होण्यास मदत होईल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 70 वर्षे मराठ्यांचा घात झाला!

## ओबीसी नेत्यांचा उल्लेख करत जरांगे पाटलांचा आरोप

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाने आरक्षणासाठी उपोषण स्थगित केलं असलं तरीही आंदोलन चालूच ठेवलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटलांनी कालपासून (१५ नोव्हेंबर) महाराष्ट्र दौऱ्याला सुरुवात केली. आज ते पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील वरवंड येथे दौऱ्यावर आहेत. येथे त्यांनी गेल्या ७० वर्षांतील सरकारला महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. तसंच, मराठ्यांना आरक्षण मिळू नये म्हणून षडयंत्र राबवले गेले असल्याचा आरोप जरांगे पाटलांनी केला.**



मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा महाराष्ट्र दौरा सुरू केला आहे. मात्र या दौऱ्यात ते नियोजित वेळी पोहोचू शकत नाहीत. गावागावातील मराठा बांधव यांच्या स्वागतासाठी उभे असल्याने कार्यक्रमस्थळी पोहोचण्यास उशीर होतो. याबाबत त्यांनी दिलगीर व्यक्त केली. ते म्हणाले की, "सकाळी ११ ची वेळ ठरली होती. गावागावातील लोकांनी गाडी अडवल्याने मला तुमच्यापर्यंत पोहोचायला उशीर झाला, त्याबद्दल मी तुमची मनापासून माफी मागतो. तुम्हाला खूप वेळ उन्हात बसायला लावलं.

पण माझी सध्याची परिस्थिती अशी झाली की दिलेल्या वेळेवर मी पोहोचू शकत नाही, कारण लोक रस्त्यावर अडवायला लागले. मराठ्यांचे लोक रस्त्यावर उभे असताना, त्यांच्यासोबत त्यांचे आई-वडिल-बहिण उभे असताना त्यांना डावलून पुढे येणाऱ्यांची माझी अवलाद नाही. म्हणून मला उशीर होतोय. मी राजकारणी नाही, म्हणून लोकांना वाट बघायला लावायचं आणि नंतर जायचं. मी या समाजाला मायबाप मानलं आहे. मी तुमचं लेकरू आहे. स्वतःच्या लेकराला न्याय देण्यासाठी घराघरातील मराठा ताकदीने एकजूट झाला आणि मराठ्यांची प्रचंड मोठी त्सुनामी राज्यात आली. मराठ्यांच्या त्सुनामी पुढे सरकारलाही नमतं घ्यावं लागलं."

"मराठा कशामुळे एक झाला, मराठ्यांना इतक्या ताकदीने एकत्र येण्याची गरज काय पडली, मराठा ऊन बघायला तयार नाही, मराठा पाऊस बघायला तयार नाही, मराठा थंडीतही रात्रभर जागायला लागला. याचं कारण सरकारने शोधायला पाहिजे होतं. गोर-गरिब मराठ्यांचे मुडदे पाडून, आरक्षण न दिल्यामुळे स्वतःच्या लेकराला न्याय देण्यासाठी काना-कोपऱ्यातील, राज्यातील मराठा एक झाला. ७० वर्षांपासून सरकार बोलत होतं, मराठ्यांच्या नोंदी नाहीत. मराठ्यांचे दस्तावेज नाहीत. मराठ्यांचे पुरावे नसल्याने आरक्षण दिलं नाही", असं जरांगे पाटील म्हणाले."मराठ्यांच्या लेकराच्या हितांचंच बोलेन. लेकराचं ऐकण्यासाठी आणि आपल्या लेकरांना न्याय देण्यासाठी कोणीच मागे सरकायचं नाही. ७० वर्षांपासून सरकारने पाळलेले जे काही बगलबच्चे आहेत त्यांनी ७० वर्षांपासून मराठ्यांचे असणारे पुरावे स्वतःच्या बुडाखाली झाकून ठेवले. समित्या नेमल्या, आयोग नेमले, सर्व्हेही केला. पण मराठ्यांची नोंद कोणालाच सापडली नाही. मराठा ७० वर्षांपासून ओबीसी आरक्षणात असतानाही मराठ्यांना आरक्षण नाही. याचं कारणही आमच्या मराठ्यांनी कधी शोधलं नाही", अशी खंतही जरांगेंनी बोलून दाखवली. "समितीने पुरावे शोधायला सुरू केले. पण मराठ्यांचे ७० वर्षांपासूनचे पुरावे नाहीत असं सांगितलं. १८०५ पासून १९६७ पर्यंत आणि १९६७ पासून २०२३ पर्यंत न्यायमूर्ती शिंदे यांच्या समितीने मराठ्यांचे दस्तावेज शोधायला सुरुवात केली. २०१८ ते २०२३ पर्यंत लाखोने मराठे ओबीसीमध्ये असल्याचे पुरावे सापडले आहेत. आता आमचं म्हणणं आहे की सत्तर वर्षे आमचे पुरावे लपवून ठेवले कोणी? त्यांची सरकारने नावे सांगावीत. तुम्ही कशाच्या आधारावर मराठ्यांचे पुरावे नाही असं म्हणाला होतात. मग ते आता कसे सापडले?", असा प्रश्न जरांगेंनी उपस्थित केला.

"मराठ्यांच्या लेकरांना आरक्षण असतानाही घात झाला. या सगळ्यांनी षडयंत्र केलं. ७० वर्षे सत्तेवर ओबीसी नेत्यांचा किती प्रभाव होता. मराठ्यांचे पुरावे असतानाही बाहेर आले नाहीत. यांनी ठरवून षडयंत्र केलं होतं. मराठ्यांना जर आरक्षण दिलं तर मराठ्यांचे पोर मोठे होतील, मराठ्यांच्या पोरांना मोठं होऊ द्यायचं नाही, यासाठी लागेल ते प्रयत्न करायचे. हे प्रयत्न केले आणि ७० वर्षे मराठ्यांच्या पोरांच्या आयुष्याची राखरांगोळी झाली.

### मग आता कसे पुरावे सापडले?

"समितीने पुरावे शोधायला सुरू केले. पण मराठ्यांचे ७० वर्षांपासूनचे पुरावे नाहीत असं सांगितलं. १८०५ पासून १९६७ पर्यंत आणि १९६७ पासून २०२३ पर्यंत न्यायमूर्ती शिंदे यांच्या समितीने मराठ्यांचे दस्तावेज शोधायला सुरुवात केली. २०१८ ते २०२३ पर्यंत लाखोने मराठे ओबीसीमध्ये असल्याचे पुरावे सापडले आहेत. आता आमचं म्हणणं आहे की सत्तर वर्षे आमचे पुरावे लपवून ठेवले कोणी? त्यांची सरकारने नावे सांगावीत. तुम्ही कशाच्या आधारावर मराठ्यांचे पुरावे नाही असं म्हणाला होतात. मग ते आता कसे सापडले?", असा प्रश्न जरांगेंनी उपस्थित केला.

# अमित शाहांविरोधात उद्धव ठाकरेंचं निवडणूक आयोगाला पत्र

## इंडिया आघाडीतले लोक आणि ठाकरे काहीतरी बोलतील : सामंत

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज

**मध्य प्रदेशात भाजपाचे सरकार आल्यास भाविकांना रामलल्लाचे (राम मंदिर, अयोध्या) मोफत दर्शन घडवण्यात येईल. त्याचा खर्च भाजपा सरकार करेल, असं आश्वासन गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी (१३ नोव्हेंबर) दिलं होतं. यावर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाष्य केलं आहे.**



उद्धव ठाकरे म्हणाले,"कर्नाटक विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'बजरंगबली की जय' म्हणत मतदान करण्याचं आवाहन केलं होतं. **गृहमंत्री अमित शाह यांनी मध्य प्रदेशात 'रामल्लाचे दर्शन मोफत घडवू' असं जाहीर केलं आहे. अमित शाहांनी फक्त मध्य प्रदेशपुरती ही घोषणा करू नये. देशातील कानाकोपऱ्यात रामभक्त आहेत. त्या भक्तांना सोयीनुसार मोफत अयोध्यावारी घडवावी."**

उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्यावर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. उदय सामंत म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांच्या वक्तव्यावर भाष्य केलं. परंतु, आठ दिवसांपूर्वी त्यांच्या इंडिया आघाडीतले सदस्य असलेल्या नितीश कुमार यांनी केलेल्या अश्लील वक्तव्यावर काहीच बोलले नाहीत. बिहारच्या विधानसभेत मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी ज्या पद्धतीने महिलांवर अश्लील शेरेबाजी केली, अश्लील वक्तव्य केलं त्याबाबतीत उद्धव ठाकरे यांनी त्यांचं म्हणणं मांडलं पाहिजे. परंतु, उद्धव ठाकरे त्याबाबत काहीच बोलले नाहीत. उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, आम्हाला अपेक्षित होतं की, नितीश कुमार यांनी महिलांबाबत केलेल्या अश्लील वक्तव्यावर इंडिया आघाडीतले लोक बोलतील, उद्धव ठाकरे यांच्या पत्रकार परिषदेत यावर बोलतील. परंतु, तसं काही झालं नाही. उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांच्या वक्तव्याबाबत निवडणूक आयोगाला पत्र लिहिलं आहे. त्याबाबत निवडणूक आयोग निर्णय घेईल.

### .... तर प्रजनन दर घसरतो

मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता अधोरेखित केली. यावेळी त्यांनी एक विचित्र वक्तव्य केलं होतं. ज्यामुळे सभागृहात उपस्थित असलेल्या महिला आमदार खजिल झाल्या, तर पुरुष आमदारांमध्ये कुजबुज सुरू झाली. नितीश कुमार यांच्या विचित्र वक्तव्यामुळे विरोधी पक्षांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. "पुरुष रोज रात्री पत्नीशी संबंध निर्माण करतात. यामुळे मूल जन्माला येते. परंतु, मुली साक्षर असतील तर प्रजनन दर घसरतो. मुलगी सुशिक्षित असेल तर प्रजनन दर सरासरी दोन टक्क्यांपर्यंत खाली येतो आणि जर तिने शालेय शिक्षण पूर्ण केले असेल तर प्रजनन दर राष्ट्रीय स्तरावर १.७ टक्क्यांपर्यंत खाली येतो.

# लोक मरत होते आणि पंतप्रधान मोदी थाळी वाजवण्यास सांगत होते!

## आमचे सरकार गरिबांसाठी काम करते : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस नेते राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी (PM MODI) यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. कोरोना काळात देशभरात मृत्यूचे तांडव सुरू असताना दुसरीकडे पंतप्रधान मोदी हे थाळी वाजवण्यास सांगत होते, मोबाईल टॉर्च लावण्यास सांगत असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली. पंतप्रधान मोदी हे भांडवलदारांसाठी काम करत असल्याचा बोचरा वारही राहुल गांधी यांनी केला.**



राजस्थानमधील चुरू येथील एका सभेला संबोधित करताना राहुल गांधी यांनी भाजप आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडले. राहुल यांनी म्हटले की, आमचे सरकार गरिबांसाठी काम करते. सामान्य लोकांचे संरक्षण करतो. मात्र, पंतप्रधान मोदी यांनी जीएसटी लागू केला आणि आता देशातील शेतकऱ्यांना कर भरावा लागत आहे. त्यांनी नोटाबंदी केली आणि छोटे व्यापारी, उद्योजकांना उद्ध्वस्त केले. राहुल गांधी यांनी जाहीर सभेत म्हटले की, आज लोक पीएम मोदींच्या आश्वासनांवर हसतात. 15 लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. लोकांना ते मिळाले का? मोदींचा हमीभाव म्हणजे अदानीचा हमीभाव आणि काँग्रेसचे सरकार म्हणजे शेतकरी आणि मजुरांचे सरकार असल्याचेही राहुल गांधी यांनी म्हटले. तुम्हाला अदानींचे सरकार हवे आहे की शेतकरी, मजूर आणि तरुणांचे सरकार हवे? असा थेट सवाल राहुल यांनी जाहिर सभेत असणाऱ्यांना लोकांना केला. राजस्थान सरकारने लोकांसाठी खूप काम केले असून भाजपचे सरकार सत्तेवर आल्यास आम्ही ज्या योजना राबवल्या, त्या रद्द करतील आणि अब्जाधीशांसाठी काम करेल, असा दावा राहुल गांधी यांनी केला. राहुल यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी आणि अदानी यांच्यात साटंलोटं असल्याचा आरोप करणारे भाषण केले. जिकडे पाहावे तिकडे अदानी काही ना काही धंदा करत आहे. विमानतळ, बंदरे, सिमेंट प्लांट, रस्ते सर्व त्याच्या मालकीचे आहेत. ते (पीएम मोदी) श्रीमंतांसाठी काम करतात. ते अदानीला मदत करतात, अदानी पैसे कमवतात आणि तो पैसा परदेशात वापरला जातो, असेही त्यांनी म्हटले. कृषी कायद्याबाबत राहुल गांधी म्हणाले, "पीएम मोदींनी कृषी कायदा आणला आणि त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल, असे सांगितले, पण त्याविरोधात देशातील सर्व शेतकऱ्यांनी धरणे-आंदोलन केले. हा कायदा शेतकऱ्यांच्या हिताचा नसून अदानी-अंबानी यांच्या हिताचा असल्याचे सांगितले. काँग्रेसनेदेखील शेतकऱ्यांच्या आंदोलनाला साथ दिली आणि हा काळा कायदा हाणून पाडला असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले.

### तुम्हाला अदानींचे सरकार हवे का?

» राहुल गांधी यांनी जाहीर सभेत म्हटले की, आज लोक पीएम मोदींच्या आश्वासनांवर हसतात. 15 लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. लोकांना ते मिळाले का? मोदींचा हमीभाव म्हणजे अदानीचा हमीभाव आणि काँग्रेसचे सरकार म्हणजे शेतकरी आणि मजुरांचे सरकार असल्याचेही राहुल गांधी यांनी म्हटले. तुम्हाला अदानींचे सरकार हवे आहे की शेतकरी, मजूर आणि तरुणांचे सरकार हवे? असा थेट सवाल राहुल यांनी जाहिर सभेत असणाऱ्यांना लोकांना केला. राजस्थान सरकारने लोकांसाठी खूप काम केले असून भाजपचे सरकार सत्तेवर आल्यास आम्ही ज्या योजना राबवल्या, त्या रद्द करतील आणि अब्जाधीशांसाठी काम करेल, असा दावा राहुल गांधी यांनी केला.

# न्यायालयाने सुनावल्यानंतर राज्यपाल नरमले!

## राजकीय हेतू ठेवून राज्य सरकारच्या कामात अडथळा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतातल्या अनेक बिगर भाजपाशासित राज्यांमधील सरकार आणि राज्यपालांमध्ये टोकाचा संघर्ष चालू आहे. महाराष्ट्रातही उद्धव ठाकरे यांचं सरकार असताना तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि राज्य सरकारमध्ये मोठा संघर्ष झाल्याचं आपण पाहिलं आहे. राज्यपाल राजकीय हेतू ठेवून राज्य सरकारच्या कामात अडथळा निर्माण करत आहेत, असा आरोप या राज्य सरकारांकडून सातत्याने केल जात आहे.**

दरम्यान, तुम्ही आगीशी खेळत आहात, अशी टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयाने बिगर भाजपाशासित राज्यांच्या राज्यपालांची शुक्रवारी कानउघडणी केली. नामधारी प्रमुख म्हणून राज्यपाल विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या वैधतेवर शंका उपस्थित करू शकत नाहीत किंवा सभागृहाने मंजूर केलेल्या विधेयकांवरील निर्णय अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवू शकत नाहीत, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांना खडेबोल सुनावले होते. त्यानंतर आता तमिळनाडूचे राज्यपाल नरमले आहेत. तमिळनाडू विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यास विलंब करण्याच्या राज्यपाल आर. एन. रवी यांच्या कारभाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली होती. राज्यपालांनी १२ विधेयके प्रलंबित ठेवल्याच्या तमिळनाडू सरकारच्या आरोपाप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला भूमिका मांडण्याचे निर्देश शुक्रवारी दिले होते. या आदेशांनंतर तामिळनाडूच्या राज्यपालांनी प्रलंबित विधेयकांवर निर्णय घेतला आहे. राज्यपाल आर. एन. रवी यांनी १० विधेयके परत केली आहेत. विधानसभेत मंजूर केल्यानंतर ही विधेयके संमतीसाठी राज्यपालांकडे पाठवण्यात आली होती. राज्यपालांकडे एकूण १२ विधेयके प्रलंबित होती. त्यापैकी १० विधेयके त्यांनी परत केली आहेत. राज्यपालांनी परत पाठवलेली अनेक विधेयके ही राज्यातील विद्यापीठांशी संबंधित आहेत. त्यामुळे राज्य सरकारने शनिवारी पुन्हा एकदा ही विधेयके मांडण्यासाठी आणि मंजूर करण्यासाठी तमिळनाडू विधानसभेचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे. तमिळनाडू विधानसभेचे अध्यक्ष एम. अप्पावू यांनी हे अधिवेशन बोलावलं आहे. चार अधिकृत आदेश आणि ५४ कैद्यांच्या मुदतपूर्व सुटकेशी संबंधित फाईल आणि १२ विधेयके राज्यपालांकडे प्रलंबित होती.




### आर. एन. रवी यांच्या कारभाराबाबत नाराजी

» नामधारी प्रमुख म्हणून राज्यपाल विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या वैधतेवर शंका उपस्थित करू शकत नाहीत किंवा सभागृहाने मंजूर केलेल्या विधेयकांवरील निर्णय अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवू शकत नाहीत, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांना खडेबोल सुनावले होते. त्यानंतर आता तमिळनाडूचे राज्यपाल नरमले आहेत. तमिळनाडू विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यास विलंब करण्याच्या राज्यपाल आर. एन. रवी यांच्या कारभाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली होती.

# ट्रोल करणाऱ्यांना प्रिया बापटचं सडेतोड उत्तर

मराठी मनोरंजनसृष्टीतील सेलिब्रिटी हे चाहत्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्य वाटत असतात. या सेलिब्रिटींची एखादी कृती चाहत्यांना खटकते आणि त्यानंतर त्यांना प्रचंड ट्रोल करण्यात येतं. काही दिवसांपूर्वी अभिनेत्री प्रिया बापट (PRIYA BAPAT) ऑस्ट्रेलियाला फिरायला गेली होती. त्यावेळी तिने बिकिनीतील फोटो शेअर केले होते. हे फोटो शेअर केल्यानंतर काही चाहत्यांनी अभिनेत्रीच्या धाडसाचं कौतुक केलं. तर दुसरीकडे मात्र काहींनी तिला चांगलं ट्रोल केलं. पण त्यावेळी या चाहत्यांना अभिनेत्रीने काहीही उत्तर दिलं नाही. आता नुकत्याच एका मुलाखतीत अभिनेत्रीने याप्रकरणावर तिचं मत मांडलं आहे. राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीत प्रिया बापट म्हणाली,"ऑस्ट्रेलियामधील बिकिनीतील फोटो शेअर केल्यानंतर मी प्रचंड ट्रोल झाले. पण त्यावेळी मी शांत राहणं पसंत केलं. दुसरीकडे माझ्याच काही चाहत्यांनी माझी बाजू घेतली. मला असं वाटतं, आपण खूप सोयीस्कररित्या मराठी संस्कृतीचे झेंडे घेऊन फिरतो. मला ही गोष्ट आवडत नाही. मी कोणते कपडे घालावेत यावरुन आपली संस्कृती नाही ठरत". प्रिया बापट म्हणाली,"माझं वागणं, माझे आचार-विचार, माझ्या घरच्यांची शिकवण, मी चार लोकांसोबत कशी बोलते, त्यांच्यासोबत कशी वागते, मी माझं काम प्रामाणिकपणे करते की नाही यावर माझा सुसंस्कृतपणा ठरतो. माझ्या कपड्यांवर ठरत नाही. ज्यांना मी साडी नेसली म्हणजे चांगली आणि बिकनी घातली म्हणजे वाईट असं ज्यांना कोणाला वाटत असेल तर मला त्यांना उत्तरंचं द्यावसं वाटत नाही. मुळातच कोणत्याही व्यक्तीसाठी ती व्यक्ती चांगली आहे की वाईट आहे, ती सुसंस्कृत आहे की असंस्कृत आहे हे ठरवण्यासाठी कपडे हे अत्यंत चुकीचा क्रायटेरिया आहे. माझ्याकडे काम नाही म्हणून मी असे फोटो शेअर केले असंही बऱ्याच जणांनी म्हटलं आहे. बिकीनीतील फोटो शेअर केल्यानंतर मला काम मिळेल असं त्यांचं मत होतं. पण खरंतर बिकीनी घातली म्हणजे काम मिळेल असं या इंडस्ट्रीत होत नाही". प्रिया पुढे म्हणाली,"मी माझ्या



आवडीसाठी बिकीनी घातली होती. आपल्या प्रत्येकाचे बेंचमार्क असतात. आज मला माझ्या शरीराबद्दल आत्मविश्वास आहे. मी जशी आहे तशी वावरू शकते. प्रत्येकाचा एक बॉडी टाईप असतो. मी स्वत:ला आवडते हे कळायला मला थोडा वेळ लागला. मी स्वत:ला बिकिनीमध्ये आवडले म्हणून मी ते फोटो शेअर केले. बाकी कोणाला ते आवडावे हा मुद्दाच नव्हता. चाहत्यांना तुम्ही घरातले वाटतात. त्यामुळे ते हक्काने कमेंट्स करत असतात. पण मला किंवा माझ्या घरच्यांना मी केलेली गोष्ट चूक आहे असं वाटत नाही तोपर्यंत मी या गोष्टीचा फार विचार करत नाही.

# माधुरी निवडणूक लढवण्याच्या चर्चा

अभिनेत्री माधुरी दीक्षित सध्या चर्चेत आहेत. माधुरी दीक्षित-नेने आता लवकरच भाजपकडून (BJP) निवडणूक लढवणार असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. मात्र सध्या अशी कोणतीच चर्चा भाजपमध्ये सुरु नसल्याची माहिती भाजपच्या वरिष्ठ नेत्याने एबीपी माझाला दिली आहे. अभिनेत्री माधुरी दीक्षित भाजपकडून लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. याआधीदेखील अशीच चर्चा रंगली होती. पण सध्या तरी राजकारणात प्रवेश करण्याचा माझा विचार नाही, असं म्हणत माधुरी दीक्षित यांनी या चर्चांना पूर्णविराम दिला होता. पण आता पुन्हा एकदा या चर्चांना सुरुवात झाली आहे. पण अशी कोणतीच चर्चा भाजपमध्ये सुरू नसल्याची माहिती भाजपच्या वरिष्ठ नेत्याने एबीपी माझाला दिली आहे. तसेच लोकसभेचं तिकीट कोणाला द्यायचं हा सर्वस्वी निर्णय केंद्रातून होणार नाही. लोकसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे आता सर्वच राजकीय पक्षांकडून निवडणूकीची जोरदार तयारी सुरू झाली आहे. आता धकधक गर्ल लोकप्रिय अभिनेत्री माधुरी दीक्षित निवडणुकीच्या रिंगणार उतरणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. माधुरी दीक्षितला भाजपातर्फे तिकीट मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही महिन्यांपूर्वी गणेशोत्सवादरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबईत आले होते. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सागर' या शासकीय निवासस्थानी त्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत लोकसभा निवडणुकीसंदर्भात चर्चा झाली.

# अंकिता देणार गोड बातमी?

'बिग बॉस 17' (BIGG BOSS 17) या कार्यक्रमाची स्पर्धक अंकिता लोखंडे (ANKITA LOKHANDE) सध्या प्रेग्नंसीच्या बातम्यांमुळे चर्चेत आहे. अंकिताचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये अभिनेत्री म्हणत आहे की तिला पाळी आलेली नाही. तसेच तिची प्रेग्नंसी टेस्टदेखील झाली आहे. विकीसोबत बोलतानाचा अंकिताचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'बिग बॉस 17'मधील चर्चेत असणाऱ्या व्यक्तींमध्ये अंकिता लोखंडेचा समावेश आहे. विकी जैन ते सुशांत सिंह राजपूतपर्यंत (SUSHANT SINGH RAJPUT) वेगवेगळ्या विषयांवर अंकिताने या घरात भाष्य केलं आहे. पण आता 'बिग बॉस 17'च्या घरात अंकिताला मळमळ आणि उलट्यांचा त्रास व्हायला लागला आहे. तसेच आंबट पदार्थ खाण्याची इच्छा होत आहे. अंकिताला पाळीदेखील आलेली नाही". अंकिता लोखंडेचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये अंकिता विकीला सांगत आहे की,"सध्या मी खूप कन्फ्यूज आहे. माझी प्रेग्नंसी टेस्ट देखील झाली आहे. प्रेग्नंसी टेस्टसह ब्लड टेस्ट आणि यूरिन प्रेग्नंसी टेस्टदेखील झाली आहे. मला पाळीदेखील आलेली नाही. मी खरचं प्रेग्नंट आहे की नाही हे मला माहिती नाही. पण आता मला घरी जायचं आहे". अंकिता लोखंडे आणि विकी जैन यांना 'बिग बॉस'च्या घरात वेगवेगळ्या खोल्यांमध्ये शिफ्ट करण्यात आले आहे. अंकिता सुरुवातीपासून 'दिल' या खोलीत आहे. पण विकीला आता दिलमधून 'दिमाग' या खोलीत शिफ्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अंकिता नाराज असून या कारणाने त्यांच्यात भांडणदेखील झालं आहे.



# मेरी क्रिसमस'ची रिलीज डेट ढकलली पुढे

दाक्षिणात्य सुपरस्टार विजय सेतुपती (VIJAY SETHUPATHI) आणि बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ (KATRINA KAIF) काही दिवसांपासू त्यांच्या आगामी 'मेरी क्रिसमस' (MERRY CHRISTMAS) या सिनेमामुळे चर्चेत आहेत. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पण आता या सिनेमाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली आहे. 'मेरी क्रिसमस' या सिनेमाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली आहे. 'मेरी क्रिसमस' हा सिनेमा आधी 15 डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार होता. पण नंतर या सिनेमाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली. 8 डिसेंबरला हा सिनेमा रिलीज होणार असल्याचं जाहीर करण्यात आलं. पण आता पुन्हा या सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. कतरिना कैफ आणि विजय सेतुपती यांचा 'मेरी क्रिसमस' हा सिनेमा सध्या चर्चेत आहे. वारंवार या सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात येत आहे. आता पुन्हा एकदा या सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. आता या सिनेमासाठी प्रेक्षकांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. कतरिना आणि विजय यांचा 'मेरी क्रिसम हा सिनेमा 8 डिसेंबरला नव्हे तर 2024 च्या जानेवारीत प्रदर्शित होणार आहे.



# आलिया भट्टने घातला महागडा ड्रेस

लोकप्रिय कार्यक्रम 'कॉफी विथ करण 8' (KOFFEE WITH KARAN 8) नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या कार्यक्रमाच्या आगामी भागात बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर (KAREENA KAPOOR) आणि आलिया भट्ट (ALIA BHATT) हजेरी लावणार आहेत. 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमासाठी करीना आणि आलियाने महागडा ड्रेस परिधान केला आहे. 'कॉफी विथ करण 8'च्या चौथ्या भागात बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर आणि आलिया भट्ट हजेरी लावणार आहेत. दोघीही आघाडीच्या बॉलिवूड अभिनेत्री असल्या तरी करीना नात्याने आलियाची नणंद आहे. या कार्यक्रमाच्या आगामी भागाचा एक प्रोमो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. प्रोमोमध्ये आलिया आणि करीनाचा फॅशनेबल लूक पाहायला मिळत आहे. आलिया भट्टने करीना कपूरसोबत स्क्रीन शेअर करताना चॉकलेटी रंगाचा शिमरी गाउन परिधान केला होता. फिगर फिटिंगच्या या स्टायलिश ड्रेसने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आलियाने हा शिमर ड्रेस लूक पूर्ण करण्यासाठी या ड्रेसवर मॅचिंग हील्स घातले होते. आलियाचा हा ड्रेस भाव खाऊन गेला आहे. करीना कपूरच्या ड्रेसनेदेखील चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. करीनानेदेखील स्टायलिश लूक केला होता. ब्लॅक अँन्ड व्हाइट मोनोक्रोमॅटिक लूकमध्ये बेबो खूपच सुंदर दिसत होती. तिने पांढऱ्या रंगाचा ऑफ शोल्डर टॉप आणि फिगर फिटिंग डिटेलिंग असलेली मैक्सी स्कर्ट परिधान केला होता. 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमासाठी आलिया भट्ट आणि करीना कपूरने महागडा ड्रेस परिधान केला होता. आलियाने घातलेल्या चॉकलेटी रंगाच्या शिमरी ड्रेसची किंमत 1550 डॉलर म्हणजेच जवळपास 1.28 लाख रुपये आहे. तर करीना कपूरने घातलेल्या ड्रेसचे किंमत 74 हजार रुपये आहे. आलिया भट्ट आणि करीना कपूरचा ड्रेस तुम्हाला आवडला असेल आणि तुम्हाला हा लूक कॉपी करायचा असेल तर त्यांच्या कपड्यांच्या किंमती जाणून तुम्ही हैराण व्हाल.

# गंभीरकडून विराट कोहलीचे कौतुक!

## 50 व्या शतकाबद्दल विराट कोहली तुझे अभिनंदन

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**विराट कोहलीने न्यूझीलंड विरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात 117 धावांची ऐतिहासिक खेळी केली. किंग कोहलीचे हे वनडेतील 50 वे शतक ठरले. त्याने क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरला मागे टाकले. यासह वनडेतील सर्वाधिक शतकांचा विक्रम आपल्या नावावर केला. कोहलीने (VIRAT KOHLI) आपले 50 वे शतक पूर्ण केले तेव्हा सचिन तेंडुलकर (SACHIN TENDULKAR) देखील वानखेडे स्टेडियमच्या प्रेक्षक गॅलरीत उपस्थित होता. शतक पूर्ण केल्यानंतर कोहलीने प्रथम तेंडुलकर जिथे बसला होता त्या दिशेने नतमस्तक होऊन अभिवादन केले.**





कोहलीवर (VIRAT KOHLI) सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यात त्याचा टीकाकार गौतम गंभीरही मागे नाही. गंभीरने (GAUTAM GAMBHIR) चक्क कौतुक करून कोहलीच्या रेकॉर्डब्रेक शतकावर प्रतिक्रिया दिली आहे. भारताच्या या माजी खेळाडूने याबाबत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट शेअर केली आहे. '50 व्या शतकाबद्दल विराट कोहली तुझे अभिनंदन. सचिन तेंडुलकरच्या पुढे जाणे ही मोठी कामगिरी आहे. मला खात्री आहे की त्याच्या दिवंगत वडिलांना आज खूप अभिमान वाटत असणार. ते स्वर्गातून आपल्या मुलाकडे गर्वने पाहत असतील. त्यांच्या चेह-यावर हास्य असेल. विराट तू या पिढीतील आतापर्यंतचा सर्वात महान खेळाडू आहेस.

कोहलीने (VIRAT KOHLI) 2009 मध्ये श्रीलंकेविरुद्ध पहिले वनडे शतक झळकावले होते, तेव्हा गंभीरनेही त्या सामन्यात शतक झळकावले होते. गंभीरला ऑफिशियल प्लेअर ऑफ द मॅचचा किताब देण्यात आला. जेव्हा गंभीर हा पुरस्कार घेण्यासाठी आला तेव्हा गंभीरने कोहलीला तिथे बोलवून त्याला मिळालेला हा पुरस्कार कोहलीला प्रदान केला होता. याबाबत गंभीर म्हणाला होता की, 'या सामन्यात कोहलीने त्याचे पहिले शतक झळकावले आहे. पहिले शतक कोणत्याही खेळाडूसाठी खूप खास असते. मला कोहलीचे पहिले शतक संस्मरणीय बनवायचे होते.' गंभीर आणि कोहलीचे चाहतेही अनेकदा सोशल मीडियावर भांडताना दिसतात. अशा स्थितीत कोहलीबाबत गंभीरने दिलेले प्रत्येक विधान चर्चेचा विषय बनते. मात्र, यादरम्यान असे अनेक प्रसंग पाहायला मिळाले आहेत जेव्हा गंभीरने कोहलीच्या कामगिरीचे कौतुक केले आहे.

या क्रमाने, आता त्याने त्याच्या 50 व्या एकदिवसीय शतकासाठी त्याचे अभिनंदन केले आहे, ज्यानंतर चाहते देखील खूप आनंदी दिसत आहेत. वास्तविक, आयपीएल 2023 दरम्यान नवीन-उल-हक आणि विराट कोहली यांच्यातील वादात गौतम गंभीरही पडला होता. त्यानंतर विराट आणि गंभीरमध्ये बाचाबाची झाली होती आणि इथून दोघांमधील मतभेद वाढतच गेले होते.

### कोहलीचे पहिले शतक संस्मरणीय

कोहलीने (VIRAT KOHLI) 2009 मध्ये श्रीलंकेविरुद्ध पहिले वनडे शतक झळकावले होते, तेव्हा गंभीरनेही त्या सामन्यात शतक झळकावले होते. गंभीरला ऑफिशियल प्लेअर ऑफ द मॅचचा किताब देण्यात आला. जेव्हा गंभीर हा पुरस्कार घेण्यासाठी आला तेव्हा गंभीरने कोहलीला तिथे बोलवून त्याला मिळालेला हा पुरस्कार कोहलीला प्रदान केला होता. याबाबत गंभीर म्हणाला होता की, 'या सामन्यात कोहलीने त्याचे पहिले शतक झळकावले आहे. पहिले शतक कोणत्याही खेळाडूसाठी खूप खास असते. मला कोहलीचे पहिले शतक संस्मरणीय बनवायचे होते.' गंभीर आणि कोहलीचे चाहतेही अनेकदा सोशल मीडियावर भांडताना दिसतात. अशा स्थितीत कोहलीबाबत गंभीरने दिलेले प्रत्येक विधान चर्चेचा विषय बनते. मात्र, यादरम्यान असे अनेक प्रसंग पाहायला मिळाले आहेत जेव्हा गंभीरने कोहलीच्या कामगिरीचे कौतुक केले आहे.

# टीम इंडियाच्या मेगाफायनलला पीएम मोदी उपस्थित राहणार!

## शमीच्या गोलंदाजीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले कौतुक

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**टीम इंडियाने न्यूझीलंडचा 70 धावांनी पराभव करत विश्वचषक 2023 च्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या सामन्यात मोहम्मद शमीने शानदार गोलंदाजी करत सात विकेट्स घेतल्या. फायनलचा महामुकाबला 19 नोव्हेंबर रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. हा सामना पाहण्यासाठी पीएम मोदी स्वत: उपस्थित राहणार आहेत.**






दरम्यान, न्यूझीलंडविरुद्ध सात विकेट घेत टीम इंडियाची फायनल निश्चित केलेल्या मोहम्मद शमीच्या गोलंदाजीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खूप कौतुक केले आहे. त्यांनी ट्विट करून शमीवर कौतुकाचा वर्षाव केला. ते म्हणाले की, आजची उपांत्य फेरी अधिक खास बनली ती चमकदार वैयक्तिक कामगिरीमुळे. मोहम्मद शमीची शानदार गोलंदाजी क्रिकेटप्रेमींच्या भावी पिढ्यांच्या स्मरणात राहील. शमी छान खेळला! यंदाच्या विश्वचषकात शमीने सहा सामन्यांत 23 बळी घेतले आहेत. न्यूझीलंडविरुद्धच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. सेमीफायनलच्या महामुकाबल्यात टीम इंडियाने नाणेफेक जिंकून फलंदाजी करत 397 धावांची मोठी धावसंख्या उभारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ 327 धावांवर गडगडला. भारतीय संघाचा विश्वचषकातील हा सलग 10वा विजय आहे. मोहम्मद शमीने 9.5 षटकांत 57 धावांत 7 बळी घेतले. पंतप्रधान मोदींशिवाय गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, काँग्रेस नेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्यासह अनेक नेत्यांनी भारताच्या विजयाचे अभिनंदन केले. विराट कोहली आणि श्रेयस अय्यर यांनी विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडविरुद्ध शानदार शतके झळकावली. या सामन्यात कोहलीने आपले 50 वे शतक पूर्ण केले. हे शतक झळकावून कोहलीने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा 49 शतकांचा विक्रम मोडला. आता एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम विराट कोहलीच्या नावावर आहे.

### अनेक नेत्यांनी विजयाचे अभिनंदन केले

टीम इंडियाने न्यूझीलंडचा 70 धावांनी पराभव करत विश्वचषक 2023 च्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. महामुकाबला 19 नोव्हेंबर रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. सेमीफायनलच्या महामुकाबल्यात टीम इंडियाने नाणेफेक जिंकून फलंदाजी करत 397 धावांची मोठी धावसंख्या उभारली. न्यूझीलंडचा संघ 327 धावांवर गडगडला. भारतीय संघाचा विश्वचषकातील हा सलग 10वा विजय आहे. मोहम्मद शमीने 9.5 षटकांत 57 धावांत 7 बळी घेतले. पंतप्रधान मोदींशिवाय गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, काँग्रेस नेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्यासह अनेक नेत्यांनी भारताच्या विजयाचे अभिनंदन केले.